# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता कर विभागामार्फत सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात ₹१९३ कोटीची विक्रमी कर वसुली**
- **अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, नियंत्रण अधिकारी, सहाय्यक नियंत्रण अधिकारी, मालमत्ता कर विभागप्रमुख, कर निरीक्षक, वसुली लिपिक व कर्मचाऱ्यांच्या मेहनतमुळे हे यश प्राप्त - मा. आयुक्त**

दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी मध्यरात्रीपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता कर विभागामार्फत ₹१९३ कोटीची विक्रमी कर वसुली करण्यात आली आहे. मालमत्ता कर वसुलीचा वेग हा आणखी जास्त प्रमाणात वाढवण्यात यावा यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली सततच्या मालमत्ता कर विभाग आढावा बैठकीनुसार शहरातील मालमत्ता कराचा सतत पाठपुरावा करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मिरा भाईंदर शहरामधील बऱ्याचश्या मालमत्ता धारकांकडे वर्षानुवर्षे थकबाकी असल्याने अश्या वर्षानुवर्षे थकित असलेल्या मालमत्तांच्या बाबतीत महापालिका मा. आयुक्त यांच्या आदेशानुसार सदर मालमत्ता जप्त करण्यात याव्यात व त्यावर महानगरपालिकेचे नाव चढवून अश्या मालमत्ता जाहीर लिलावद्वारे विक्री करण्याचे निर्देश देण्यात आले होते. याबाबत सतत शहरातील नागरिकांमध्ये विशेष जनजागृती देखील करण्यात आली होती. सदर कारवाईस सुरुवात होताच व जनजागृती केल्या कारणाने शहरातील मालमत्ता धारकांनी कर भरणा करण्यास सुरुवात केली.

सदर कारवाईचे परिणाम म्हणून दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी मध्यरात्रीपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता कर विभागामार्फत ₹१९३ कोटीची विक्रमी कर वसुली करण्यात आली आहे. ₹१९३ कोटी मालमत्ता कर वसुली करण्याचे श्रेय आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (कर विभाग), नियंत्रण अधिकारी, सहाय्यक नियंत्रण अधिकारी, मालमत्ता कर विभागप्रमुख, सर्व कर निरीक्षक, कर वसुली लिपिक व कर्मचारी यांना दिले आहे. मागील वर्षी दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी ₹१८२ कोटी इतकी कर वसुली करण्यात आली होती. मागील वर्षीच्या तुलनेत यंदाची मालमत्ता कर वसुली ही उत्कृष्टरित्या व वेगाने झाली आहे. मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार, उपायुक्त (माहिती तंत्रज्ञान) यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांच्या विभागामार्फत विकसित करण्यात आलेल्या www.mbmc.gov.in वेबसाईट व MyMBMC मोबाईल ॲपचा वापर करून मालमत्ता कर भरणा करण्यासाठी नागरिकांना आव्हान करण्यात आले होते. सदर आव्हानाला नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. ऑनलाईन पद्धतीवर विशेष भर देत १ लाख १० हजार ९७४ नागरिकांनी तर रोख रक्कमद्वारे १ लाख ७३ हजार ५७३ नागरिकांनी कर भरणा करून महापालिकेस सहकार्य केले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका कोषाग्रहामध्ये एकूण मालमत्ता कर १९३ कोटी ०८ लाख ३६ हजार २५३ इतका जमा करण्यात आलेला आहे.

आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली मिरा भाईंदर महापालिकेच्या स्थापनेपासून आज पर्यंतची सर्वात जास्त मालमत्ता कराची विक्रमी वसुली ₹१९३ कोटी इतकी करण्यात आली. सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे कर वसुलीसाठी केलेल्या प्रयत्नाचे हे फळ असल्याचे मा. आयुक्त यांनी सांगितले व सर्वांचे अभिनंदन मा. आयुक्त यांनी केले. शहरातील सर्व नागरिकांनी मालमत्ता कराचा भरणा करून केलेल्या सहकार्याबद्दल महापालिकेच्या व आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने सर्वांचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.